क्र. २०११/आरबी-डेस्क/आस्था/१/कावि
जिल्हाधिकारी कार्यालय, बीड
दिनांक :- ४/११/२०११

## जाहीरात

बीड जिल्हाधिकारी कार्यालयात निव्वळ कंत्राटी तत्वावर संगणक ऑपरेटर एकून ५० पदे नेमावयाचे आहेत. त्यासाठी इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागविण्यात येत आहेत.उमेदवार किमान पदवीधर असून एम.एस.सी.आय.टी. परीक्षा उतिर्ण झालेला असावा व त्यास एम.एस. ऑफीस, एक्सेल व इंटरनेटची परिपंर्ण ज्ञान व अनूभव असावा अशा व्यक्तीकडून खालील प्रमाणे अर्ज मागविण्यात येत आहेत. (पदसंख्येत बदल करण्याचे अधिकार निम्न स्वाक्षरीतांनी राखून ठेवले आहेत. )

सदरची नियूक्ती कंत्राटी स्वरुपात असून प्राप्त झालेल्या अर्जाची छाननी करुन उमेदवार निवड मूलाखतीद्धारा करण्यात येईल. अर्जाची संख्या अधिक असल्यास लेखी परिक्षा ,संगणकावर काम करण्याची क्षमता चाचणी व मूलाखती द्धारा निवड करण्यात येईल.(या बाबत जिल्हाधिकारी यांचा निर्णय अंतीम राहील.)

| अ.क्र. | कंत्राटी पदाचे नांव | शैक्षणिक पात्रता | मानधन | आवश्यक पदसंख्या |
|---|---|---|---|---|
| १ | संगणक ऑपरेटर | (१) उमेदवार कोणत्याही शाखेचा किमान पदवीधर असावा.<br>(२) एम.एस.सी.आय.टी. परिक्षा उतिर्ण झालेला असावा.<br>(३) त्यास एम.एस. ऑफीस , एक्सेल,व इंटरनेटचे परीपूंर्ण ज्ञान असावे.<br>(४) सदर कामाचा किमान तीन वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे.<br>(५) बी.एस.सी. (कॉम्प्यूटर सायंन्स), बी.सी.ए.,एम.सी.ए. व पदव्यूत्तर पदवीधर असल्यास प्राधान्य दिले जाईल.<br>(६) उमेदवाराचा मराठी व इंग्रजी टंकलेखनाची गती अनूक्रमे ३० व ४० श.प्र.मि. असावी . | रु. ३०००/- | ५० |

## अटी व शर्ती

१. उमेदवाराचे वय जाहीरात प्रसिध्द होण्याचे दिनांकास किमान वयोमर्यादा १८ वर्षापेक्षा कमी नसावे. व कमाल ३० वर्ष पेक्षा जास्त नसावे. (मागासवर्गीयासाठी नियमानुसार शिथीलक्षम)
२. अर्जासोबत शैक्षणिक पात्रतेच्या व अनूभवाबाबतच्या सत्यप्रती राजपत्रित अधिका-यांनी साक्षांकित केलेल्या प्रती जोडणे आवश्यक आहे. मूळ प्रती प्रत्यक्ष मुलाखतीच्या वेळी पडताळणी साठी सादर करणे आवश्यक आहे. तसेच साक्षांकित प्रती सादर न केल्यास उमेदवाराचा अर्ज अपात्र ठरविण्यात येईल.
३. उमेदवाराची मराठी व इंग्रजी टंकलेखनाची गती अनूक्रमे ३० व ४० श.प्र.मि. असावी.
४. उमेदवारास इंटरनेट व संगणकावर काम करण्याचा किमान तीन वर्षाचा अनूभव असावा.
५. उमेदवार MSCIT परिक्षा उतिर्ण असावा. त्यास संगणक हताळणीचे / इंटरनेटचे पूरेसे ज्ञान असावे.
६. उमेदवार कोणत्याही राजकीय पक्षाशी सबंधीत नसावा.
७. सदरच्या नेमणूका हया निव्वळ कंत्राटी स्वरुपाच्या असून काम असमाधानकारक असल्यास कोणत्याही वेळी उमेदवाराची नियूक्ती रद्य करण्याचे अधिकार मा. जिल्हाधिकारी यांना राखून ठेवले आहेत.

८. सदरच्या नेमणूका हया निव्वळ कंत्राटी स्वरुपाच्या आहेत. त्यामूळे उमेदवारांना सेवा नियमीत किंवा कायम पणाचे कोणतीही मागणी करता येणार नाही किंवा शासकीय सेवेचा दावा करता येणार नाही.शासकीय सेवेचा दावा करता येणार नाही.शासकीय सेवेची कोणतीही मागणी अनुज्ञेय असणार नाही.

९. निवड झालेल्या उमेदवारांस रुपये १००/-बॉन्ड पेपरवर ७ दिवसात करारनामा करून देणे बंधन कारक राहील.

१०. नियुक्त उमेदवारांकडून आर्थीक किंवा इतर नुकसान झाल्यास ते त्याचा मानधनातून वसूल करण्यात येईल .

११. नियुक्त उमेदवारांस त्यांचे स्वत:चे इच्छेनुसार सेवामुक्त व्हावयाचे असल्यास एक महीन्याची अगाऊ नोटीस देणे बंधनकारक आहे व एक महीण्याचे मानधन शासनास परत करावे लागेल तसेच त्यांना कोणत्याही कारण न दर्शविता काढून टाकण्याचा निम्न स्वाक्षरीतांना आहे.

१२. नियुक्त उमेदवारांना जिल्हाधिकारी बीड यांनी दिलेल्या आदेशानुसार नेमून दिलेल्या ठिकाणी कार्यालयीन वेळेत पूर्ण वेळ हजर राहून नेमूण दिलेले काम करणे बंधनकारक राहील. आवश्यकता भासल्यास सूटटीचे दिवशी सूध्दा काम करावे लागेल.

१३. उमेदवारास काम करताना कूठल्याही प्रकारच्या अनपेक्षित घटना अपघात इत्यादी कारणामूळे शारीरीक व इतर स्वरूपाची इजा झाल्यास त्यास शासनास जबाबदार असणार नाही. या बाबत कोणतीही भरपाई किंवा मदत दिली जाणार नाही.

१४. अर्ज करण्याचा अंतिम दिनांक १९ /११/२०११ रोजी ठिक १८-०० वाजेपर्यत अशी असून जाहीराती पूर्वीचे व मूदतीनंतर प्राप्त होणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

१५. अर्ज A-४ साईजवर संगणीकृत किंवा टंकलिखीत करुन सोबतच्या नमून्यात सादर करावा. सोबत स्वत:चा परिपूंर्ण पत्ता असलेला व रुपये ०५/- चा पोष्ट स्टँप लावलेला लिफाफा जोडण्यात यावा.

१६. प्राप्त अर्जाची छाननी करुन पात्र उमेदवारांनाच मूलाखतीसाठी / लेखी परिक्षेसाठी बोलावण्यात येईल. अपात्र ठरलेल्या उमेदवारास कोणताही पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा कारण कळवले जाणार नाही किंवा सबब ऐकूण घेतली जाणार नाही . तसेच उमेदवारास मूलाखतीसाठी, चाचणी साठी किंवा परिक्षेसाठी कोणत्याही प्रकारचा भत्ता किंवा प्रवासभत्ता अनूज्ञेय राहणार नाही.

१७. जर मोठया प्रमाणावर अर्ज प्राप्त झाल्यास लेखी परिक्षा, संगणकिय चाचणी परिक्षा व मूलाखत घेतली जाईल याबाबतचा अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार निम्न स्वाक्षरीतानी राखून ठेवला आहे.

१८. उपरोक्त मानधनाव्यतिरिक्त कोणतेही भत्ते सवलती अनूज्ञेय असणार नाहीत.

१९. अर्जासोबत जिल्हाधिकारी बीड यांचे नांवे रु २००/- चा राष्ट्रीयकृत बँकचा डी.डी. नापरतावा म्हणून जोडणे बंधनकारक आहे. तसेच डी.डी. न जोडलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

२०. अर्जदाराने रहिवाशी पूरावा (प्राधिकृत अधिका-याचा ) सोबत जोडावा.

२१. उमेदवाराचे कर्तव्य कार्यक्षेत्र बीड जिल्हा राहील त्यानूसार व आवश्यकतेनूसार कोणत्याही तालूक्यात नेमणूक दिली जाईल त्यासाठी उमेदवाराचा पसंतीचा विचार केला जाणार नाही परंतू नेमणूक झाल्यानंतर कर्तव्य कार्यालय ठिकाणी बदलण्याचे अधिकार निम्नस्वाक्षरीताकडे राखून ठेवले आहेत. उमेदवारस कोणत्याही तालूक्याचे मूख्यालयी व जिल्हा मूख्यालयी काम करावे लागेल.

२२. पदांच्या संख्येत वेळेनूसार कमी जास्त बदल करणे पद रद्य करणे इत्यादी अधिकार निम्न स्वाक्षरीताकडे राखून ठेवण्यात आले आहेत.

स्वाक्षरीत/-

**जिल्हाधिकारी बीड**

**अर्जाचा नमूना**

| उमेदवाराचा सद्यस्थितीतला पासपोर्ट आकाराचा फोटो येथे चिटकवावा. |
|---|

प्रति,

मा. जिल्हाधिकारी , बीड

पदाचे नांव :- कंत्राटी तत्वावरील संगणक ऑपरेटर .

१. उमेदवाराचे संपूर्ण नांव :------------------------------------------------------------------------
(आडनांव प्रथम लिहावे)

२. पत्रव्यवहाराचा पूर्ण पत्ता :------------------------------------------------------------------------
------------------------------------------------------------------------
ई-मेल आयडी :------------------------ भ्रमणध्वनी क्रमांक :----------------

३. जन्मतारीख (शालांत प्रमाणपत्र अथवा टी.सी. नूसार) :---------------------------------------------

४. अर्जासोबत जोडलेला धनाकर्ष क्र. -------------- दिनांक --------------- बँकेचे नांव ------------------

५. शैक्षणिक पात्रता :- (दहावी पासून )

| अ.क्र. | परिक्षेचे नांव | उतिर्ण वर्ष | मंडळ / विद्यापीठाचे नांव | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |
| ५ | | | | |

६. संगणक अर्हता :-

७. टायपिंग :-

८. अनूभवाबाबतचा तपशिल :-

| अ.क्र. | संस्था/ कार्यालयाचे नांव | पदनाम | वेतनश्रेणी /मानधन | कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | | | | |
| २ | | | | |
| ३ | | | | |
| ४ | | | | |

(टिप :- सोबत अनूभवाचे प्रमाणपत्र जोडणे आवश्यक आहे)

९. अर्जासोबत सादर केलेल्या प्रमाणत्र / कागदपत्रांच्या प्रती

१.-----------------------------------
२.-----------------------------------
३.-----------------------------------
४------------------------------------

मी खालील सही करणार असे प्रमाणीत करतो की उपरोक्त माहिती मी भरली असूल ती चूकीची आढळून आल्यास मी कायदेशीर कार्यवाहीस पात्र ठरेल . तसेच माझ्रा अर्ज अपुंर्ण असल्यास मी कोणतीही तक्रार करणार नाही अथवा न्यायालयाचा मार्ग अवलंबणार नाही.

(अर्जदाराचे पूर्ण नांव व स्वाक्षरी )

दिनांक :-

स्थळ :-